**प्रेसनोट दि.२७/०३/२०१९**

**सिंहगड रोड पो.स्टे.पुणे शहर**

**कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने सिंहगड रोड भागातील रिक्षा चालक / मालकां मध्ये जनजागृती**

दि.२६/०३/२०१९ रोजी १७/३० वा. ते १९/०० वा. चे दरम्यान अभिरुची पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,एच.एम.ननावरे, महिला पोलीस उप-निरीक्षक,आशा गायकवाड व स्टाफ यांनी मिळुन अभिरुची पोलीस चौकी येथे सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे वतीने रिक्षा चालक,मालक संघटना यांची बैठक आयोजीत केली. सदर मिटींगमध्ये पुणे पोलीस आयुक्तालया कडून कम्युनिटी पोलीसींग संदर्भात एकुण १४ ॲप/योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात उपस्थित रिक्षा चालक,मालक संघटना यांना माहीती सांगण्यात आली. सिंहगडरोड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रिक्षा चालक,मालक संघटना उत्तम प्रकारे कार्यरत असुन उपस्थित रिक्षा चालक व मालक यांना वाहतुकीचे नियम,महिलांची व मुलांची सुरक्षीतता,तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेे बाबत योग्य त्या सुचना देण्यात आल्या. कोणताही प्रश्न उदभवल्यास कोणत्याही अडचणी आल्यास त्वरीत सिंहगड रोड पो. स्टे. अथवा १०० नंबरवर कॉल करुन,पोलीस कंट्रोल रुम येथे कळवावे. आपल्या आजु-बाजूस कोणी संशयीत व्यक्ती आढळल्यास ताबडतोब पोलीसांना कळविण्यात यावे. त्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. सदर मिटींगला ३५ ते ४० रिक्षा चालक / मालक हजर होते.

( डी.व्ही.पवार )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सिंहगडरोड पो.स्टे.पुणे शहर